ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ : Registration No. :											

V1 – 2026

ವಿಷಯ ಸಂಕೇತ / Subject Code	**07 (NS)**

ಮರಾಠಿ / MARATHI

[ಸಮಯ: 3 ಗಂಟೆಗಳು] [ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 42] [ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 80]

[Time : 3 Hours] [Total No. of questions : 42] [Max. Marks : 80]

सूचना : *1. हस्ताक्षर स्वच्छ व सुबक असावे.*

2. उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

3. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

I. अ) खालील प्रश्नांतील वाक्यांसाठी योग्य पर्यायांची निवड करुन लिहा. **(10 × 1 = 10)**

1) आईच्या घरातील हे संपले होते _____.

अ) भाजी ब) पाणी

क) तांदूळ ड) गहू

2) सैनिकांच्या छावणीचा मुक्काम येथे आहे _____.

अ) दलवटणे ब) रत्नागिरी

क) कोल्हापूर ड) कोकण

3) महाराष्ट्रात शेकडो वर्षे हा जयघोष घुमवीत आहोत _____.

अ) ज्ञानोबा, नामदेव ब) तुकाराम एकनाथ

क) ग्यानबा तुकाराम ड) संत ज्ञानेश्वर

4) शेतकऱ्यांनी या खताचा शेतात वापर करावा _____.

अ) रासायनिक खत ब) नैसर्गिक खत

क) रासायनिक औषध ड) कृत्रिम खत

5) आजीला मुक्कांबिका हे नाव यांनी ठेवले _____.

अ) पंजोबानी ब) वडीलांनी

क) आजीने ड) आईने

6) पसायदान या संतानी लिहिले _____.

अ) संत निवृत्तीनाथानी ब) संत ज्ञानेश्वरांनी

क) संत सोपानदेवानी ड) संत मुक्ताबाई

7) शिवालय हे लोक बांधतात _____.

अ) पुजारी ब) श्रीमंत

क) आंधळा ड) दानशूर

8) मानवाने यात सुख मानले आहे _____.

अ) पैशात ब) घरात

क) संसारात ड) भक्तीत

9) संह्याद्रीच्या पर्वतरांगेत हा ऐटीत उभा आहे.

अ) ताजमहल ब) पर्वत

क) डोंगर ड) राजमहल

10) आई कशाची शिदोरी आहे _____.

अ) जन्माची ब) घराची

क) मुलांची ड) कवीची

ब) खालील कंसातील दिलेले योग्य शब्द निवडून लिहा. **(5 × 1 = 5)**

11) 'मुलाना' या शब्दाची विभक्ती _____.

12) अवसान गळणे _____.

13) मन खिन्न होणे _____.

14) देव नाही असे म्हणणारा _____.

15) एक ना धड _____.

(नास्तीक, भाराभर चिंध्या, द्वितीया विभक्ती, तृतिया विभक्ती, उदास होणे, धीर सोडणे, दु:खी होणे)

क) खालील जोड्या जूळवा. **(1 × 5 = 5)**

	A	B
16) i)	पाझर	A) संत बसवेश्वर
ii)	गळफास	B) संत सेनान्हावी
iii)	सत्वर पावगे मला	C) संजन गवस
iv)	मराठीयांची तो इज्जत वाचणार नाही	D) संत एकनाथ
v)	घेता नाम विठोबाचे	E) प्रा.अ.रा. कुलकर्णी
		F) अप्पासाहेब खोत

II. अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर सविस्तर लिहा. **(1 × 5 = 5)**

17) "शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे" असे शाहू महाराज का म्हणतात.

18) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तीन दैवताविषयी माहिती लिहा.

19) सईने बाळा गवंड्याचा समाचार कसा घेतला.

ब) संदर्भासह स्पष्टीकरण करा. **(कोणतेही दोन)** **(2 × 3 = 6)**

20) "आवो मेली जाय काह्या रनसतास्ति".

21) "संत रानावनात गेले नाहीत जनतेत राहूनच त्यांनी उदात्त, जीवनाचा आदर्श घालून दिला."

22) "प्रदुषण नाहीसे करणारे कारखाने काढले तर?"

23) "म्हणजे पुर्नजन्म नाही म्हणतेस काय?"

क) टीपा लिहा. **(कोणत्याही दोन)** **(2 × 4 = 8)**

24) राजा मल्लसर्ज.

25) प्रा.ग.बा. सरदार यांचे बालपण.

26) कावेरीची व्यक्तीरेखा.

27) पालकांची कर्तव्ये.

III. अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. **(1 × 4 = 4)**

28) हंस पक्षाच्या गृहस्थितीचा राजावर झालेला परिणाम लिहा.

29) 'गोफ' या कवितेतून गोविंदाग्रजानी चित्रीत केलेले प्रेम भावनेचे चित्रण करा.

30) सवर्ण मैत्रीणीने घरी जेवायला आल्याचा अनुभव दलित मैत्रिणीने कसा व्यक्त केला आहे.

ब) संदर्भासह स्पष्टीकरण करा. **(कोणतेही दोन)** **(2 × 3 = 6)**

31) "येथ म्हणे विश्वेश्वरावो। हा होईल दान पसावो।
येणे वरे ज्ञानदेवो। सुखिया जाला।।"

32) "सहज भावाचा आत्माऐक्य, कुडलसंगम देव एकच देव"

33) आई असते जन्माची शिदोरी सरतही नाही उरतही नाही.

क) टीपा लिहा. **(कोणत्याही दोन)** **(2 × 3 = 6)**

34) शाहीराने दिलेला इशारा.

35) एकलव्याच्या तुटलेल्या बोटातील रक्ताचे मोल.

36) "निष्ठा" कवितेतील बापाची शिकवण.

37) 'जीव माझा गुंतलाय' या कवितेचा भावार्थ लिहा.

IV. खालीलपैकी **तीनही** प्रश्नांची उत्तरे लिहा. **(3 × 5 = 15)**

38) गोंदा पाटलाने बाबलला कसा न्याय मिळवून दिला.

39) तात्याच्या घरच्या कोणकोणत्या आठवणी "होरपळ" या स्थुलवाचनातून सांगितल्या आहेत.

40) पंडीताला कोणत्या वाईट सवयी होत्या? त्याचा परिणाम काय झाला?

V. खालील विषयावर तक्रार अर्ज लिहा. **(1 × 5 = 5)**

41) गावातील गटारे गेली 15 दिवस स्वच्छ न केल्यामुळे गावात डासांचे व दुर्गंधीचे प्रमाण वाढले आहे, म्हणून ग्राम पंचायत अध्यक्षाना तक्रार पत्र लिहा.

VI. खालील **एका** विषयावर निबंध लिहा. **(1 × 5 = 5)**

42) शिक्षणाचे महत्व.

किंवा

जातीयता समाजाला लागलेला एक कलंक.
